# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

दुरध्वनी क्रमांक ०२०-२६२०८३५६ फॅक्स क्रमांक ०२०-२६१२८१०५

ई-मेल estt3.pco.pune@nic.in


क्रमांक-आस्था-३(२)/सेवाज्येष्ठता प्रसिध्दी/२०२४

पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर.

दि. १० /५/२०२४

**संदर्भ-** या कार्यालयाकडील पत्र क्र. आस्था-३(२)/ सेवाज्येष्ठता प्रसिध्दी/२०२४, दि.११/३/२०२४ रोजीचे व स्मरण पत्र दि.२०/३/२०२४ व ४/४/२०२४ रोजीचे.

**विषय-** पोलीस आयुक्त पुणे शहर घटकाचे आस्थापनेवरील कार्यरत पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई संवर्गातील पोलीस अंमलदार (पोलीस शिपाई ते सहाय्यक फौजदार) यांची सेवाज्येष्ठता प्रसिध्दीबाबत.- सन-२०२४

---ooo---

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, पोलीस आयुक्त पुणे शहर घटकाचे आस्थापनेवरील कार्यरत पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई संवर्गातील पोलीस शिपाई ते सहा.पोलीस फौजदार यांची तात्पूरत्या स्वरुपातील सेवाज्येष्ठता यादी पुणे पोलीस वेबसाईटवर व आपले परिमंडळ/शाखेच्या ई-मेल आयडीवर संदर्भ क्र.१ अन्वये दि.११/३/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तथापी माहे एप्रिल २०२४ अखेर कार्यरत पोलीस अंमलदारांची सेवाज्येष्ठता यादी पुनश्च प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी सर्व डी.ओ./डे-बुक अंमलदार यांनी सेवाज्येष्ठता यादीतील सर्व पोलीस अंमलदार यांच्या नावाची पडताळणी करावी व आपले पोलीस ठाणे / शाखे कडील सर्व पोलीस अंमलदार यांची माहिती बरोबर आहे का विशेषतः पोलीस अंमलदार यांचे सेवार्थ आयडी नंबर याची खात्री करावी. सर्व पोलीस अंमलदार यांना सलग ३ दिवस हजेरीवेळी संदर्भ क्र.१ मधील नमुद पत्रामधील सुचनांप्रमाणे आक्षेप / दुरुस्ती व ज्या पोलीस अंमलदाराचे नाव ज्येष्ठता यादीमध्ये नाही अशा अंमलदाराची माहिती परिमंडळ / शाखेमार्फत सादर करणेबाबत सुचना देणेत याव्यात. विशेषतः सेवार्थ आयडी भरती दिनांक / पदोन्नती दिनांकाची खात्री करणेबाबत सुचना देणेत यावेत. अंतिम सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द झालेनंतर सादर करणेत आलेले आक्षेप / दुरुस्ती अथवा मानीव तारीख मिळणेबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

सर्व पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी यांनी वरिल प्रमाणे कार्यवाही करणेबाबत आपले पोलीस ठाणे / शाखा डी.ओ. / डे-बुक यांना सक्त सुचना द्यावेत. तसेच सर्व परिमंडळ / शाखा आस्थापना लिपीकांनी आपले परिमंडळ / शाखेतंर्गत नेमणुकीस असलेल्या सर्व पोलीस अंमलदार यांचे प्राप्त आक्षेप / दुरुस्तीची त्यांचे सेवापटावरुन खात्रीकरुन सदरचे आक्षेप / दुरुस्ती संदर्भ क्र.१ मधील नमुद पत्रामधील सुचनांप्रमाणे दिनांक १५/५/२०२४ पर्यंत इकडील कार्यालयास सादर करणेत यावे.

**(सरस्वती बर्वे)**

**अति.कार्या प्रशासकीय अधिकारी**

**पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर**

**प्रति- सर्व परिमंडळ / पोलीस ठाणे / शाखा पुणे शहर.**

**प्रत- पुणे पोलीस नोटीस प्रसिध्दीकरिता.**

Scanned with CamScanne